# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# मंगळवार, दिनांक ०४ जून २०२४

## ठळक बातम्या

1. लोकसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये एनडीएला २९५ जागांवर आघाडी तर इंडी-आघाडी २३० जागांवर पुढे.
2. देशात प्रमुख उमेदवारांमध्ये चुरशीची लढत- काही ठिकाणी निर्विवाद आघाडी.
3. महाराष्ट्रात ४८ मतदारसंघांपैकी महाविकास आघाडीला २९ जागांवर आघाडी, तर महायुतीच्या पारड्यात १८ जागांचे कल.
4. विदर्भात १० मतदारसंघापैकी ७ जागांवर महाविकास आघाडीची मुसंडी. चंद्रपूर मतदारसंघाच्या प्रतिभा धानोरकर यांना मिळाली सर्वाधिक मतांची आघाडी.
5. महाराष्ट्रात आणि देशात लागलेल्या निकालावरून परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली असल्याची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रमुख शरद पवार यांची प्रतिक्रिया, इंडी-आघाडीची उद्या दिल्लीत बैठक.

*****

निवडणूक निकाल विशेष-(देश -राज्य)निहाय

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या फेऱ्या आज संपन्न होत आहेत. ९ एप्रिल ते १ जून असे ८० दिवस चाललेल्या जगातल्या सर्वात मोठ्या निवडणूक प्रक्रियेचा हा अखेरचा टप्पा आहे. देशातल्या ५४३ मतदारसंघांमधे मिळून ८ हजार ३६० उमेदवारांना, ६४ कोटी मतदारांनी दिलेला कौल उघड होत आहे. लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या कलानुसार एकूण ५४३ मतदारसंघापैकी एनडीएचे २९४ उमेदवार आघाडीवर आहेत, तर इंडीया आघाडीचे उमेदवार २३० मतदारसंघात आघाडीवर आहेत. १९ मतदारसंघांमधे अपक्ष उमेदवारांना आघाडी मिळाली आहे. महाराष्ट्रातल्या मतदार संघांचा विचार केला तर ४८ मतदारसंघांपैकी ११ मतदारसंघांमध्ये भाजपने आणि काँग्रेसनं प्रत्येकी १२ जागांवर आघाडी घेतली आहे. शिवसेनेला ७, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ९ जागांवर आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ७, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एका जागेवर आघाडी मिळाली आहे. आंध्र प्रदेशात एकूण ४२ मतदारसंघांपैकी तेलगू देसम १६, वाय एस आर काँग्रेसनं ४, तर भाजपानं ३ जागांवर आघाडी घेतली आहे. अरुणाचल प्रदेशात भाजपानं दोन्ही जागांवर आघाडी घेतली आहे. आसाममध्ये एकूण १४ जागांपैकी भाजपनं ८ जागांवर, तर काँग्रेसनं ४ जागांवर आघाडी घेतली आहे. बिहारमध्ये एकूण ४० जागांपैकी जनता दल संयुक्त १३, भाजप १२, लोक जनशक्ती पार्टी ५ जागांवर, तर राष्ट्रीय जनता दल ४ जागांवर आघाडीवर आहे. छत्तीसगडमध्ये भाजपनं १०, तर काँग्रेसनं एका जागेवर आघाडी घेतली आहे.

गोव्यात भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे. गुजरातमध्ये भाजप २५ जागांवर, तर काँग्रेस एका जागेवर आघाडीवर आहेत. हरयाणात काँग्रेसनं ५ जागांवर, तर भाजपनं ५ जागांवर आघाडी घेतली आहे. हिमाचल प्रदेशात भाजप सर्व ४ जागांवर आघाडीवर आहे. झारखंडमध्ये भाजपनं ८ जागांवर आघाडी घेतली असून काँग्रेस २ तर झारखंड मुक्ती मोर्चा २ जागांवर आघाडीवर आहे. कर्नाटकात भाजप १६ जागांवर, तर काँग्रेस १० जागांवर आघाडीवर असून जनता दल सेक्युलर २ जागांवर आघाडीवर आहे. केरळमध्ये २० मतदारसंघांपैकी काँग्रेस १४ जागांवर आघाडीवर आहे. भाजपनं एका जागेवर आघाडी घेतली असून, इंडियन युनियन मुस्लिम लीगला एक जागा मिळाली आहे. मध्य प्रदेशात २९ मतदारसंघांपैकी सर्व मतदारसंघात भाजपनं आघाडी घेतली आहे. मणिपूरमध्ये २ मतदारसंघांपैकी काँग्रेसला दोन्ही जागांवर आघाडी मिळाली आहे. मेघालयात २ मतदारसंघांपैकी पीपल्स पार्टीला आणि काँग्रेसला प्रत्येकी एका जागेवर आघाडी मिळाली आहे. मिझोराममध्ये असलेल्या एकाच जागेवर झोराम पीपल्स मुव्हमेंट आघाडीवर आहे. नागालँडमध्ये असलेल्या एकाच जागेवर काँग्रेस पक्ष आघाडीवर आहे. ओदिशात २१ मतदारसंघांपैकी भाजपानं १९ जागांवर आघाडी घेतली असून बिजू जनता दल आणि काँग्रेस प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे. पंजाबमध्ये १३ मतदारसंघांपैकी काँग्रेसनं ७ जागांवर आघाडी घेतली असून आम आदमी पार्टी ३ जागांवर, तर शिरोमणी अकाली दल एका जागेवर आघाडीवर आहे. राजस्थानात २५ मतदारसंघांपैकी भाजपनं १४ जागांवर, तर काँग्रेस ८ जागांवर आघाडीवर असून मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टी आणि भारतीय आदिवासी पार्टी प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे. सिक्कीममध्ये असलेल्या एकाच मतदारसंघात सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा आघाडीवर आहे. तामिळनाडूत ३९ मतदारसंघात द्रमुक २२ ठिकाणी, तर काँग्रेस ९ ठिकाणी आघाडीवर आहे. त्रिपुरात दोन्ही जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. तेलंगणात भाजप आणि काँग्रेस प्रत्येकी ८ जागांवर आघाडीवर आहेत. उत्तर प्रदेशात ८० मतदारसंघांपैकी भाजपनं ३६ जागांवर आघाडी घेतली असून समाजवादी पार्टी ३४ जागांवर, तर काँग्रेस ६ आणि राष्ट्रवादी लोकदल २ जागांवर आघाडीवर आहे. उत्तराखंडमधे सर्व ५ जागांपैकी भाजपानं सर्व पाचही जागांवर आघाडी घेतली आहे. पश्चिम बंगालमध्ये ४२ मतदारसंघांपैकी तृणमूल काँग्रेस २९ जागांवर, तर भाजपनं १२ जागांवर आघाडी घेतली आहे. अंदमान निकोबारमध्ये असलेल्या एकाच जागेवर भाजपाने आघाडी घेतली आहे.

## निवडणूक निकाल-प्रमुख लढती राष्ट्रीय

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या आत्तापर्यंतचा कल पाहता पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसीमधून १ लक्ष ५२ हजार ३५५ मतांनी आघाडीवर आहेत. भाजपच्या स्मृती इराणी ३ लाख ४७ हजार ४३४ मतांनी अमेठी इथून पिछाडीवर आहेत, तर

त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे किशोरीलाल ५ लाख १ हजार ९५ मतांसह आघाडीवर असून त्यांच्यात १ लाख ५३ हजार ६६१ मतांचा फरक आहे. भाजपच्या मनेका गांधी सुलतानपूरमधून ३९ हजार १७६ मतांनी पिछाडीवर असून, समाजवादी पार्टीचे राम भुवन निषाद आघाडीवर आहेत. अनंतनाग -राजौरी मधून पीडीपीच्या  मेहबुबा मुफ्ती २ लाख ७९ हजार २७९ मतांनी पिछाडीवर आहेत. जम्मू काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे मिया लतीफ अहमद या मतदारसंघात जिंकत आहेत. भाजपच्या कंगना रानौत हिमाचल प्रदेशच्या  मंडी मतदारसंघातून ७३ हजार ७०३ मतांनी आघाडीवर आहेत, तर  केंद्रीय मंत्री अनुराग सिंग ठाकूर हमीरपूर मतदार संघातून  १ लाख ८२ हजार ३५७ मतांनी आघाडीवर आहेत.

## निवडणूक निकाल-महाराष्ट्र

महाराष्ट्रात ताज्या मतमोजणीनुसार संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेल्या बारामती मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे सुमारे २१ हजार मतांनी आघाडीवर आहेत, तर सांगलीमध्ये अपक्ष उमेदवार विशाल पाटील ५ हजारांपेक्षा अधिक मतांनी आघाडीवर आहेत. बीडमध्ये भाजपच्या पंकजा मुंडे सुमारे ३८ हजार मतांनी आघाडीवर आहेत. कल्याणमध्ये शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, तर ठाण्यात शिवसेनेचे नरेश म्हस्के आघाडीवर आहेत. रायगडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार गटाचे सुनील तटकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या अनंत गीते यांच्यावर विजय मिळवला आहे. रत्नागिरी सिंधुदुर्गमध्ये भाजपाचे नारायण राणे विजयी झाले आहेत. त्यांना ४ लाख ४२ हजार ७७८ मतं  मिळाली, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांना ३ लाख ९२ हजार ७६४ मतं मिळाली. अहमदनगरमध्ये  राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नीलेश लंके यांनी सुमारे ७ हजार ६०० मतांची आघाडी घेतली आहे, त्यांच्या विरुद्ध भाजपाचे सुजय विखे पाटील आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांनी सुमारे ४ हजार मतांची आघाडी घेतली आहे. भाजपाचे उमेदवार राम सातपुते त्यांच्या विरोधात उभे आहेत. उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीच्या अर्चना पाटील तब्बल २ लाख तेहतीस हजार मतांनी आघाडीवर आहेत, तर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार ओमप्रकाश राजे निंबाळकर पिछाडीवर आहेत.जळगाव लोकसभा मतदारसंघात भाजपच्या स्मिता वाघ विजयी ठरल्या आहेत. त्यांच्या विरोधात ठाकरे गटाचे करण पवार निवडणुकीच्या रिंगणात होते. स्मिता वाघ यांनी जवळपास 1 लाख 85 हजार 988 मतांची आघाडी घेतली आहे. निवडणूक आयोगाकडून स्मिता वाघ यांच्या विजयाची औपचारिक घोषणा होणे बाकी आहे. राज्यातल्या काही मतदारसंघात उमेदवारांनी जवळ जवळ एक लाख किंवा त्याहून अधिक मतांनी आघाडी घेतली आहे. कल्याणमध्ये श्रीकांत शिंदे यांनी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वैशाली दरेकर यांच्यावर सुमारे १ लाख ९९ हजार मतांची आघाडी घेतली आहे. नंदुरबारमध्ये

काँग्रेसचे गोवाल पडवी यांनी भाजपाच्या विद्यमान खासदार हीना गावीत यांच्यावर सुमारे दीड लाखाहून अधिक मतांनी आघाडी घेतली आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे श्रीरंग बारणे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजोग वाघिरे यांच्यापेक्षा सुमारे ९६ हजार मतांनी आघाडीवर आहेत.नाशिक मतदारसंघात महाविकास आघाडीचे राजाभाऊ वाजे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे हेमंत गोडसे यांच्यापेक्षा ८१ हजार २७४ मतांनी आघाडीवर आहेत. जालना लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांच्यात अटीतटीची लढत पहायला मिळत आहे. फेरीनिहाय निकालात डॉ.काळे सध्या सुमारे ५४ हजार मतांनी आघाडीवर आहेत.

## निवडणूक निकाल विशेष-विदर्भ मतदारसंघ निहाय

विदर्भात ५ वाजेपर्यंतचे कल समोर आले आहेत, त्यानुसार महाविकास आघाडीचे उमेदवार ७ मतदारसंघांतून आणि महायुतीचे उमेदवार ३ मतदार संघात आघाडीवर आहेत. काँग्रेसचे उमेदवार एकूण ५ मतदारसंघात आघाडीवर आहेत. निवडणूक आयोगाच्या वोटर ऍपच्या ताज्या माहितीनुसार नागपुरात भाजपचे नितीन गडकरी यांना ६ लाख ३२ हजार ६५१ इतकी मते पडली असून सुमारे १ लाख ३४ हजार मतांनी ते काँग्रेसच्या विकास ठाकरे यांच्या पुढे आहेत. बुलढाणा इथं शिवसेना शिंदे गटाचे प्रतापराव जाधव यांना ३ लाख ४८ हजार २३८ इतकी मते मिळाली असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नरेंद्र खेडेकरांपेक्षा सुमारे २९ हजारांनी ते आघाडीवर आहेत. अकोला इथं भाजपचे अनुप धोत्रे ४ लक्ष ३८ हजार ६७० मतं मिळाली काँग्रेसचे उमेदवार अभय पाटील यांना ४ लाख २ हजार १६७ मतं मिळाली आहे. अमरावती इथं काँग्रेसचे बळवंत वानखेडे यांना ४ लक्ष ३९ हजार ३४५, तर भाजपच्या नवनीत राणा यांना ४ लाख २८ हजार ६०१ इतकी मतं पडली. वानखेडे १० हजार ७४४ इतक्या फरकाने आघाडीवर आहेत. वर्धा इथं राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार अमर काळे सुमारे ३९ हजार मतांनी आघाडीवर आहेत. रामटेक इथं काँग्रेसचे श्यामकुमार बर्वे सुमारे ६२ हजारांनी आघाडीवर आहेत. तर शिवसेनेचे राजू पारवे यांना आतापर्यंत ४ लाख १४ हजार ९८ मतं पडली आहेत. भंडारा - गोंदिया मतदारसंघात काँग्रेसचे डॉ. प्रशांत पडोळे आघाडीवर आहेत. त्यांना ४ लक्ष १२ हजार ७६१ मतं पडली. तर सुनील मेंढे ३९ हजार ६३० मतांसह पिछाडीवर आहेत. गडचिरोली- चिमूर मतदारसंघांमध्ये काँग्रेसचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान आघाडीवर आहेत. तर भाजपचे अशोक नेते पिछाडीवर आहेत. चंद्रपूरमध्ये काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकर यांनी मोठ्या फरकाने आघाडी घेतली आहे. त्यांना सुमारे ६ लाख ५० हजार १७५ मतं मिळाली असून सुधीर मुनगंटीवारांपेक्षा २ लाख ३२ हजार मतांनी त्या पुढं आहेत. यवतमाळ - वाशीममध्ये शिवसेना शिंदे गटाच्या राजश्री

पाटील यांना ४ लक्ष ६७ हजार ९८, तर संजय देशमुख यांना ५ लक्ष ५४ हजार ८१८ इतकी मतं पडली आहेत. देशमुख सुमारे ८७ हजार मतांनी आघाडीवर आहेत.

### शरद पवार

महाराष्ट्रात आणि देशात लागलेल्या निकालावरून परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. देश पातळीवरचे चित्र आशादायक आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. शेती, महागाई, बेरोजगारी, अशा मूलभूत मुद्द्यांवर लोकांनी मतदान केलं आणि धार्मिक राजकारण जनतेने नाकारलं. उत्तर प्रदेशमध्ये जनतेनं वेगळा निकाल दिला आहे. कारण यापूर्वी भाजपला तिथं मोठं मताधिक्य मिळत होतं. आता हा आकडा मर्यादित झाला आहे. तिथं इंडिया आघाडीला मतदारांनी चांगली साथ दिली आहे, असं ते म्हणाले. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने राज्यात दहा जागांवर उमेदवार उभे केले होते. त्यापैकी ७ उमेदवार आघाडीवर आहे, राज्यात परिवर्तनाची लहर आहे हे आघाडीला मिळलेल्या विजयावरून सिद्ध झालं आहे, असं प्रतिपादन शरद पवार यांनी यावेळी केलं. आजच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीची बैठक उद्या दिल्लीमध्ये होण्याची शक्यता असून या बैठकीला आपण उपस्थित राहणार असल्याचं पवार म्हणाले. उद्धव ठाकरे यांची शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्रितपणे हि निवडणूक लढली त्यामुळे हा सांघिक विजय असल्याचं प्रतिपादन पवार यांनी केलं. पुढील नीती सहकाऱ्यांशी चर्चा करून ठरवून लोकांची सेवा करू, असं देखील ते म्हणाले. दरम्यान, नुकत्याच नवी दिल्ली इथं काँग्रेस नेते राहुल गांधींसह, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. लोकसभा निवडणुकांचे निकाल हे जनतेचे निकाल असून हि लढाई मोदी विरुद्ध जनतेची लढाई होती आणि विनम्रतेने आम्ही हे निकाल स्वीकारतो असं प्रतिपादन खरगे यांनी यावेळी केलं.

### नाना पटोले-पत्र परिषद

महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महाराष्ट्रातील शेतकरी आणि तरुणांचे आभार मानले आहेत. ही निवडणूक म्हणजे विद्यमान सरकारच्या विरोधात जनतेची लढाई होती, असं सांगत हुकूमशाही विरोधातलं हे परिवर्तन आहे, असं पटोले म्हणाले. राहुल गांधींच्या न्याय यात्रेला जनतेनं दिलेला हा प्रतिसाद आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. कोण्याही व्यक्तीपेक्षा जनता मोठी आहे हे या निकालानं दाखवून दिलं आहे; तसच घटनाबाहय सरकार कधीच चालू शकत नाही, हे देखील महाराष्ट्रातील जनतेनं दाखवून दिलं आहे, असं पटोले म्हणाले. जनतेला गृहीत धरण्याचं काम भाजपने केलं; मात्र देशात लोकशाही कायम असल्याचं जनतेनं दाखवून दिलं, असं ते म्हणाले.

### ओडिशा-आंध्र-मतमोजणी

लोकसभा निवडणुकांच्या मतमोजणीसोबत आज आंध्र प्रदेश आणि ओडिशा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी देखील संपन्न होत आहे. आंध्रप्रदेश इथं एकूण 175 जागांपैकी तेलगु देशम पक्षाला 136 जागांवर आघाडी मिळाली आहे. तर जन सेना पार्टी जेएसपी पक्षाला 21 जागांवर आघाडी मिळाली आहे. भाजपला आठ जागा मिळाल्या असून वायएसआर-सीपी पक्षाला दहा जागा मिळाल्या आहेत. याशिवाय ओडिशा विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप 80 जागांवर आघाडीवर आहे, तर बिजू जनता दल 49 जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेस पक्षाला 14 जागा मिळाल्या आहेत, तर सीपीएम पक्षाला एक जागा मिळाली आहे.

## शेयर बाजार

एक्झिट पोलच्या अंदाजानुसार लोकसभा निवडणुकीचे अपेक्षित निकाल न आल्यामुळे भारतीय शेअर बाजारात आज मोठी पडझड पाहायला मिळाली. सकाळी सत्र चालू होताच शेअर बाजार गडगडायला सुरुवात झाली होती. आता दुपारपर्यंत याच शेअर बाजार अधिक खाली गेला. मुंबई शेअर बाजाराचा (बीएसई) निर्देशांक सेन्सेक्स थेट 4 हजार 501 अंकांनी गडगडला. काल 76 हजार 569 अंकांवर पोहोचलेला शेअर बाजार आज थेट 71 हजार 956 अंकांपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे बाजारात जोरदार विक्री होत असून गुंतवणूकदारांना 21 लाख कोटींहून अधिक रुपयांचा फटका बसला आहे. दुपारपर्यंत हा आकडा 45 लाख कोटी रुपयांच्या घरात गेला होता. मुंबई शेअर बाजारा प्रमाणेच राष्ट्रीय शेअर बाजारात देखील मोठी घसरण पाहायला मिळाली. बाजार तज्ञांच्या मते, निफ्टीमध्ये फेब्रुवारी २०२२ नंतरची सर्वांत मोठी घसरण असून आणखी काही दिवस बाजारात  पडझड सुरूच राहणार आहे.

## हवामान

विदर्भात येत्या आठ जून पर्यंत सर्व जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. यादरम्यान हलका पाऊस पडू शकतो. याशिवाय विदर्भात गेल्या 24 तासात सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं 43 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ वर्धा इथं 42 पूर्णांक 1 तर, चंद्रपूर इथं 42 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. नागपूर इथं 41.8, अकोला इथं 41.6 दशांश अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवण्यात आलं, तर गोंदिया, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांमध्ये तापमान  40 अंश सेल्सिअसच्या घरात आहे. भंडारा, गडचिरोली आणि बुलढाणा या ठिकाणी तापमान 38 आणि 39 अंश सेल्सिअसच्या दरम्यान आहे.

*****